# प्रेस नोट दिनांक २०/०३/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## रिक्षा चालकाचे प्रामाणिक कर्तव्याबाबत बाबत.

दिनांक १९.३.२०१९ रोजी प्रविण मधुकर कुलकर्णी,रा.राघोबा पाटीलनगर,खराडी,स.नं.२०/२,पुणे यांची रिक्षा क्रं. एमएच/१२/०४५४ हिचेमधुन संतोष गणेश मगर,रा.धायरी फाटा,पुणे हे रॅडीसन हॉटेल,खराडी बायपास रोड,पुणे येथुन बसुन वाघेश्वर मंदिर,नगररोड,पुणे येथे प्रवास करुन उतरले. संतोष गणेश मगर यांची रिक्षा मधुन खाली उतरताना एक बॅग सदर रिक्षामध्ये विसरुन ते निघुन गेले होते. रिक्षाचालक प्रविण कुलकर्णी बॅग यांना सदर बॅग विसरलेचे निदर्शनास आल्याने,त्यांनी सदरची बॅग चंदननगर पोलीस ठाणेस १५.३० वा. चे सुमारास ठाणे अंमलदार कक्षामध्ये पोशि.१०७२८,शिंदे यांचेकडे आणुन दिली. सदर बॅगेमधील साहित्याची पाहाणी करता त्यामध्ये. संतोष मगर यांचे पॅनकार्ड, मतदान कार्ड, ऑफीसची कागदपत्रे एटीएम कार्ड व रोख रु. १००/- मिळुन आले. कागदपत्रांवरील मोबाईलवरुन श्री.संतोष मगर यांचा पोशि. शिंदे व सपोफौ. माणिक शिंदे यांनी शोध घेवुन, त्यांना पोलीस ठाणेस बोलावुन रिक्षा चालक श्री. प्रविण कुलकर्णी यांचे समक्ष व वरिष्ठ पोलीस निरीक्षक - कृष्णा इंदलकर यांचे उपस्थितीत सदरची बॅग श्री.संतोष मगर यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे. त्यांची मौल्यवान कागदपत्रांसह बॅग अल्पावधीत परत मिळाल्याने त्यांचे चेहयावर आनंद दिसत होता. त्यांनी सदर रिक्षा चालकाचे व पोलीसांचे चांगल्या कामाबाबत कौतुक करुन,आभार व्यक्त केले आहेत. बॅग त्यांचे ताब्यात देतांनाचा फोटो सोबत सादर केला आहे. सदरची चांगली कामगिरी वपोनि. कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोशि. शिंदे व सपोफौ. माणिक शिंदे यांनी यांनी केलेली आहे.

